Navchaitanya Bahuuddeshiya Vikas Yuva Mandal, Shiroli

Annual Report 2024-25

Executive Summary:

Navchaitanya Bahuuddeshiya Vikas Yuva Mandal remains steadfastly committed to environmental conservation, sustainable natural resource management, and rural community development. Operating primarily in Shiroli village, the organization leverages active local participation, youth involvement, and institutional partnerships to deliver high-impact, community-driven ecological and social solutions.

Key Initiatives & Achievements (2024–25)

1. Farmland Agroforestry and Farmer Engagement:

- **Distribution and Planting:**
  Supplied native fruit and wild tree saplings including Jackfruit, Guava, Karanj, and Banyan to local farmers for planting near wells and farm shelters.
- **Monitoring and Relationship Building:**
  Implemented periodic site visits by organization representatives to monitor sapling survival rates, establishing strong trust and rapport with the agricultural community.

2. Campus Greening and Student Environmental Stewardship:

- **School Plantation Drive:**
  Partnered with Babasaheb Deshmukh Vidyalaya, Shiroli, to plant native species (Karanj, Pimple, Kadunimb, Umbar, and Pakhadi).
- **Student Ownership:**
  Students dug pits, planted saplings, and were assigned personal ownership of specific trees to ensure year-round care (including summer maintenance). This initiative cultivated peer competition, environmental awareness, and long-term habits of sustainability.



3. Mati Nala Bandh (Earthen Check Dam) Construction:

- **Hydrological Impact:**
  Earthen structures built in previous cycles increased adjacent groundwater levels 3- to 4-fold.



- **Expansion:**
  Based on positive results and direct demand from neighbouring farmers, extended deepening and bund-laying activities downstream along the targeted rivulet marking five years of systematic watershed treatment.



- **Co-financing:**
  We have successfully mobilized local community contributions alongside modest external donations to finance the expansion.

4. Mati Nala Bandh Repair, deepening and Agricultural Yield:

- **Impact on Water Availability:**
  Rehabilitation and widening of existing structures extended water availability in local wells from March through May.



- **Agricultural Benefits:**
  The water stored in the Mati Nala Bandh has enabled providing reliable irrigation for high-value crops (wheat and gram), directly enhancing crop productivity, food security and farm income.
- **Co-funding Model:**
  Repairs were executed through direct cash contributions from beneficiary farmers, reinforcing community ownership.

5. Roadside Tree Conservation and Fire Prevention

- **Prevention Strategy:**
  Engaged farmers owning land along main roads to eliminate the seasonal practice of burning dead grass, which previously destroyed roadside flora have now aware fully.
- **Protection Measures:**
  Deployed fencing, systematic watering, structural supports, and mulching to maximize survival rates.
- **Youth Involvement:**
  Mobilized local youth to maintain protection barriers, building community responsibility and climate resilience awareness.

6. Avian Biodiversity and Protection Program:



- **Shelter Infrastructure:**
  Installed artificial nesting boxes and raised bird shelters across 11 key locations (7 currently active), particularly on large roosting trees.
- **Provisioning Support:**
  Maintained static feeding stations across 3 locations and freshwater pots across 8 locations near nesting sites to support local bird populations.

7. Social Awareness Through Street Plays:



- **Performance Outreach:**
  Deployed a dedicated 8-member performing troupe (male and female artists) to conduct over 120 street plays across the region.
- **Campaign Focus Areas:**
  Raised awareness on critical health, social, and environmental issues, including HIV/AIDS, cancer awareness, de-addiction, *Sampurna Swachhata* (cleanliness drives), *Janani Suraksha Yojana* (maternal health), and integrated watershed management.
- **Partner Agencies:**
  Delivered customized awareness campaigns for government bodies and NGOs, including DAPCO, the State Health Department, and GSMT.

Institutional Network & Affiliations

To strengthen project execution and technical expertise, Navchaitanya actively collaborates with:

1. **AFARM**, Pune
2. **Sahayyak Trust**, Mumbai
3. **Song and Music Department**, Pune
4. **Devrai**, Pune

पुण्य नगरी

यवतमाळातील कामगार चौकात आयोजन | घाटंजीतील चमूने दिला तंबाखूमुक्तीचा संदेश

जागतिक तंबाखूविरोधी दिवसानिमित्त पथनाट्यातून जनजागृती

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

घाटंजी : जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, सामान्य रुग्णालय यवतमाळ यांचे अंतर्गत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम यवतमाळ द्वारा कामगार चौक यवतमाळ येथे पथनाट्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जनमानसात तंबाखू व तंबाखू जन्यपदार्थांचे व्यसन दिवसागणिक वाढत असल्यामुळे जनहितार्थ प्रचार जनजागृती पथनाट्याव्दारे करण्यात आली. सर्व प्रथम लोक गिते व प्रकल्प गीतांतून तंबाखू मुक्तीचा संदेश दिला.

घाटंजी तालुक्यातील शिरोली येथील नवचैतन्य बहु. विकास युवा मंडळ या संस्था चमूने जागतिक तंबाखूविरोधीदिनानिमित्त, स्त्री रुग्णालय यवतमाळ, समोर कामगार चौक यवतमाळ या ठिकाणी पथनाट्यातून तंबाखु, बिडी, सिगारेट, खर्रा, गुटखा, पान मसाला आदी तंबाखू जन्यपदार्थ शरीरासाठी किती घातक आहे. त्यामुळे कर्करोगा सारख्या महाभयंकर रोगाला बळी पडावे लागते. पुरुषांच्या लैगिंक जीवनावरही या व्यसनाचे



परीणाम होते. त्याच बरोबर धुम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या संपर्कातील गर्भवती मातेला गंभीर परिणामाला सामोरे जावे लागते. तरुण पिढीमध्ये अनुकरण करण्याच्या माध्यमातून धुम्रपान चे व्यसन जास्त वाढत चालले आहे. त्याला आळा बसविणे गरजेचे आहे. वाईट संगतीचा विरोध करणे काळाची गरज आहे, व्यसनापासून दूर राहण्यासाठी पथनाट्याव्दारे लोकांच्या समस्या लोकांसमोर मांडून त्याचे निरासरण कसे करावे, याचे मार्गदर्शन मनोरंजनाद्वारे या टीमच्या कलावंतांनी केले. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय यवतमाळचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राठोड यांनी कार्यक्रमाला उपस्थित नागरिकांना तंबाखू व धुम्रपान शरीरासाठी किती हानिकारक आहे. तंबाखू व धुम्रपान आजच सोडावे, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच संस्थेचे सांस्कृतिक प्रमुख प्रफुल्ल रामकृष्ण राऊत यांनीही तंबाखू व तंबाखू जन्यपदार्थांपासून दूर राहण्याचे आव्हान नागरिकांना केले. कार्यक्रमाला जिल्हा आरोग्य अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली होती. तसेच कार्यक्रमाला हजारो नागरिकांची उपस्थिती होती. संस्थाच्या टिमने जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ (राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम) च्या डॉ. मनाली बांगडे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम यशस्वी सादरीकरण केले. पथनाट्य कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्था चमूचे प्रफुल्ल राऊत, राहुल जीवने, रिना केशरवानी, प्रशांत लोखंडे, नरेश कुंटलवार, उल्हास लोखंडे, मारोती पेंदोर, गणेश उईके यांनी परिश्रम केले.

पुण्य नगरी

बाबासाहेब देशमुख विद्यालय परिसरात वृक्षारोपण

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

घाटंजी : तालुक्यातील शिरोली येथील बाबासाहेब देशमुख विद्यालयात वृक्ष लागवड कार्यक्रम पार पडला. यावेळी इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले.

सदर कार्यक्रमात नवचैतन्य संस्था, शिरोली व मुख्याध्यापक व शिक्षकाच्या मदतीने विद्यार्थ्यांचे वृक्ष लागवडीकरिता गट तयार करण्यात आले. तयार झालेल्या गटामध्ये मुलाचे १० व मुलीच्या १० गटातील विद्यार्थ्यांत गाणे घेऊन चैतन्य निर्माण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते कडुलिंब, पिंपळ, वड, करंज,



उंबर, पाकडी अशा एकूण १८ झाडे लागवडीसाठी देऊन लागवड करून घेण्यात आली. ही सर्व झाडे नवचैतन्य संस्थेच्या रोपवाटिका तयार करण्यात आली होती. झाडे लावून झाल्यावर त्या झाडांना विद्यार्थ्यांनी आपापल्या परीने काटेरी कुंपण करून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता एम. एन. गेडाम, एस. आर. मादेशवार, व्ही. व्ही. पाटील, बी. एस. आडे, ए. डब्ल्यू. बन्सोड, एम. आर. परतेकी, कुणाल मुत्यलवार, सार्थक वसेकर, एम. बी. मंचलवार लिपिक तसेच नवचैतन्य संस्था राहुल जीवने, समन्वयक अनिल बावणे यांनी सहकार्य केले. मुख्य मार्गदर्शक सुभाष मानकर यांनी मार्गदर्शन केले.

सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी लढा देणारे दैनिक
सायरन

बाबासाहेब देशमुख विद्यालय येथे वृक्ष लागवड कार्यक्रम

दै.सायरन/घाटंजी

शिरोली येथील बाबासाहेब देशमुख विद्यालय येथे वृक्ष लागवड कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी वर्ग ८ ते १० या वर्गातील एकूण विद्यार्थांनी वृक्ष लागवड कार्यक्रमात भाग घेतला. उपस्थित विद्यार्थांना या वेळी मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमात नवचैतन्य संस्था, शिरोली व मुख्याध्यापक व शिक्षकाच्या मदतीने विद्याथ्यार्चे वृक्ष लागवडी करिता गट तयार करण्यात आले.तयार झालेल्या गटामध्ये मुलाचे 10 व मुलीच्या 10 गटातील विद्यार्थ्यांत गाणे घेऊन चैतन्य निर्माण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचे शुभहस्ते कडुलिंब, पिंपळ, वड, करंज, उंबर, पाकडी अशा एकूण 18 झाडे लागवडी करिता देवून लागवड करून घेण्यात आली. ही सर्व झाडे नवचैतन्य संस्थेच्या रोपवाटीका



तयार करण्यात आली होती. झाडे तयार करतांना लागणाऱ्या पंण्या ह्या घरगुती वापर करून टाकलेल्या, ज्यात अगरबत्ती पुडे, विमजेल चे पाऊच, तेलाचे पॉकिट, अशा पण्यात रोपे तयार करण्यात आलेली होती. झाडे लावून झाल्यावर त्या झाडांना विद्यार्थ्यांनी आपापल्या परीने काटेरी कुंपण करून घेतले हे विशेष. हे काम करतांना सर्व शिक्षक वृंद विद्यार्थ्यांवर लक्ष्य ठेवून होते.या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात करिता एम एन गेडाम, एस. आर. मादेशवार, व्ही. व्ही. पाटिल, बि .एस .आडे ,ए. डब्ल्यु बन्सोड , कु.एम .आर परतेकी , मुत्यलवार, वसेकर, एम. बि. मंचलवार तसेच नवचैतन्य संस्था राहुल जीवने, अनिल बावणे यां सवानीं प्रयत्न केले. तर या कार्यक्रमा करिता मुख्य मार्गदर्शक सुभाषजी मानकर यांचे लाभले.

घाटंजीत पक्ष्यांसाठी श्रमदानातून पाणपोईची निर्मिती **नववैतन्य संस्थेच्या युवकांचा पुढाकार**

... अन् पाणवठ्यावर रंगतात पक्ष्यांच्या गप्पा

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी





घाटंजी : अवकाळी पाऊस तसेच ढगाळ वातावरण नाहिसे होऊन उन्हाची दाहकता जाणवत आहे. यात नागरिकांसह पशुपक्षी व जनावरांच्या जिवाची काहीली करीत आहेत. परिणामी येथील नवचैतन्य संस्थेच्या युवकांचा पुढाकारातून पक्ष्यांसाठी पाणपोईची निर्मिती करण्यात आली आहे. या पाणवठ्यावर दयाळी, शिंजिल पक्षी पाणी पिऊन क्षणभराची विश्रांती घेत जणू काही गप्पाच रंगवीत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

उन्हाळा लागताच सर्वांनाच झाडाच्या सावलीची आणि पिण्याच्या पाण्याची नितांत गरज वाटत असते. यात रानावनात पक्ष्याचा पण समावेश आहे. सर्वांत मोठा परिणाम रान पक्ष्यांना होत असतो. उन्हाळ्यात बरेच नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत हे आटलेले असतात. त्यामुळे उन्हाळ्यात पक्ष्यांनी पिण्याच्या पाण्याकरिता भटकंती करावी लागते. या भटकंतीत उष्माघाताने पक्ष्यांना मृत्यूलाही सामोरे जावे लागत असल्याचे चित्र दिसून येते. यामुळे निसर्गाला नैसर्गिकरित्या होणाऱ्या मदतीला आळा बसू शकतो. यावर उपाय म्हणून नवचैतन्य संस्था शिरोलीने शिरोली ते घाटंजी चार व शिरोली पंगडी या मार्गावर एक अशी एकूण पाच पक्षी पाणपोई तयार केली आहे. या करिता रोज एकूण सहा लिटर पाणी या ठिकाणावर टाकले जात आहे. या ठिकाणी पाणी पिण्याकरिता भारद्वाज, चिमणी, दयाळ, मैना, भगपाडी मैना, बुलबुल, शिंपी, होली, जांभळा शींजिर, भामटा, फुलपाखरू यासारखे पक्षी तर सरपटणारे प्राण्यात सरडा, खारुताई, मुंग्या हे प्राणी पाहायला मिळत आहे. या कामाकरिता मुख्य मार्गदर्शन सुभाष मानकर यांचे मिळाले. या कामास सातत्याने पाणी टाकण्याचे काम राहुल जीवने, विनोद पाटील, अमोल गायकवाड, प्रफुल्ल रामकृष्ण राऊत, नितेश मोहुर्ले, वैभव सोनटक्के, अनिल बावणे, प्रणय ढाले यासारखे तरुण समोर येऊन श्रमदानातून मदत करीत आहेत.

वृक्षारोपण वृक्षसंवर्धन यासोबतच वन्य पक्षाच्या जिवाची काळजी घ्यावी, यासाठी श्रमदानातून पक्ष्यांसाठी पाणपोई निर्माण करून दररोज श्रमदानातून त्याठिकाणी पाणी टाकणे हे वनविभागाला सहकार्य करणे व वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी हे नवतरुण मंडळी कार्य करीत आहेत. याची दखल तर वन्यप्रेमी घेत आहे तसेच वनविभागाच्या वरिष्ठांनी याकडे लक्ष पुरविण्याची गरज असल्याची चर्चा नागरिकांतून केल्या जात आहे.

पुण्य नगरी

शिरोलीच्या नववैतन्य संस्थेचा उपक्रम **पर्यावरण संवर्धनासह पाणी देण्याच्या विविध पद्धतीचा अवलंब**

उन्हाळ्यात पाण्याच्या बाटलीने पाणी देत जगवितात वृक्ष

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

घाटंजी : तालुक्यातील शिरोली येथील नवचैतन्य संस्था सातत्याने पर्यावरण संरक्षणचे काम करीत असते. यात वृक्ष लागवड, संगोपन, उन्हाळ्यात पाण्याची व्यवस्था करीत असते. लावलेल्या झाडांना जानेवारी ते जूनपर्यंत पाण्याची व्यवस्था संस्था करीत असते. या वर्षात लावलेल्या एकूण ३० झाडांना रोज म्हणजे १५२ दिवस सतत पाण्याची व्यवस्था केली गेली आहे. दररोज १२ लिटर पाणी झाडांना दिल जाते. पाणी देण्याची पद्धत संस्थेने वेगळी वापरली आहे.

उन्हाळ्यात थंड पाणी पिण्या करिता लोक अनेक कंपनीचे पाणी विकत घेऊन पितात आणि तशाच त्या बाटल्या टाकून देतात. यामुळे पर्यावरणात प्लास्टिकमध्ये भर पडत असते. यावर उपाय म्हणून संस्थेने या बाटल्या जमा करून त्यावर प्रायोगिक तत्वावर काम करण्याचे ठरविले. त्यानुसार बाटलीच्या तळावरील भागास एक छिद्र पडून त्यात सुतळी टाकण्यात आली. या सुतळीला आजूबाजूला पडलेल्या खऱ्याच्या पन्नीने त्या सुतळीच्या मध्यभागी गुंडाळले या मुळे इतरत्र बाटलीतील पाणी जाणार नाही. उर्वरित सुतळी ही झाडांच्या बुडालगत सोडली. यामुळे सर्व पाणी हे झाडाच्या बुडाजवळ मुरेल. झाडाच्या बुडालगत असलेले पाणी बाष्पीभवन होऊ नये म्हणून झाडाच्या बुडाला खालच्या भागाला रान गवऱ्या त्यानंतर रान गवत झाकण्यात आले. यामुळे उन्हामुळे जमिनीवर असलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होणार नाही. सोबतच झाडाच्या बुडाला असलेल्या रान गावाऱ्यांना खाण्याकरिता वेगवेगळे जीव या ठिकाणी पाहायला मिळाले. हे जीव जमिनीतून खालवर होत असल्याने झाडाच्या बुडालगतची जमीन हि भुसभुशीत झालेली पाहायला मिळाली. झाडाच्या मुळालगत हे पाणी थेंब थेंब जात असल्याने व जमीन भुसभुशीत असल्याने झाडाच्या मुळा पर्यंत ऑक्सिजन जाते व मुळे वाढण्यास मोठी मदत होताना पाहायला मिळाली. एकूणच त्या झाडाच्या बुडाला एक परिसंस्था निर्माण झालेली पाहायला मिळाली. या आच्छादानामुळे जे मुळा लागत थंडावा निर्माण होते, त्या थंडाव्याने मुंग्या, सापसुई, सरड्याचे पिले, विविध प्रकाचे जीव आश्रय घेताना पाहायला मिळाले.

एका एक लिटर बाटलीतील पाणी १२ ते १५ तास पुरते. सोबतच झाडाच्या बुडालगत असलेला ओलावा आच्छादनामुळे १२ तास राहतो. यामुळे झाडाला ४८ तासांनी पाणी दिले तरी चालते. या प्रायोगिक तत्वावर काम करण्याकरिता अमोल नीलकंठ गायकवाड यांनी बाटल्याचे संकलन करण्यास मदत केली. सुतळीकरिता वैभव सुभाष सोनटक्के या दोन तरुणाने



मदत केली. या कामाकरिता राहुल जीवने यांनी तांत्रिक परिश्रम घेतले व मुख्य मार्गदर्शक सुभाष मानकर यांचे मिळाले.